पुणे महानगरपालिका
मा.प्रशासक
पुणे महानगरपालिका

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:१६/०५/२०२४

**पुणे महानगरपालिका**
**स्थायी समिती**
**कार्यपत्रिका क्र.७**

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **शुक्रवार, दि.१७/०५/२०२४ रोजी, दुपारी ४:०० (चार) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय, चौथा मजला, पुणे महानगरपालिका भवन, शिवाजीनगर, पुणे** येथे भरेल.

मा. प्रशासक, पुणे महानगरपालिका यांचे निर्णयार्थ खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात येत आहेत.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. ४३**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगड रोड, धनकवडी सहकारनगर, व वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची माहे एप्रिल २०२४ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र.३ यांचे जा.क्र.उआप-३/४८५,दि.१०/०५/२०२४ चे पत्र

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र.४४**

पुणे शहरातील हॉस्टेल, पेईंगगेस्ट, गेस्ट हाउस, सर्विस अपार्टमेंट कर आकारणी बाबत खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/Tax/१०३४, दि.१३/१२/२०२३ चे पत्र.

१)पुणे शहरातील खासगी मालकीचे हॉस्टेल, पेईंगगेस्ट, गेस्ट हाऊस, सर्व्हिस अपार्टमेंटची कर आकारणी त्या त्या विभागातील वाजवी भाड्याच्या बिगरनिवासी दराने व प्रचलित मिळकत कर आकारणी धोरणानुसार करण्यात यावी.

२)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १३२ चे तरतुदीस अधीन राहून शासन मान्यताप्राप्त तसेच धर्मदाय नोंदणीकृत शैक्षणिक संस्था, धार्मिक संस्था यांचे मालकीचे हॉस्टेल, पेईंगगेस्ट, गेस्ट हाऊस, सर्व्हिस अपार्टमेंटची कर आकारणी त्या त्या विभागातील वाजवी भाड्याच्या निवासी दराने व प्रचलित मिळकत कर आकारणी धोरणानुसार करण्यात यावी.

**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यांनी करण्यात यावा, असे दि.१५/०३/२०२४ च्या सभेत ठरले होते.)**

**विषय क्र.४५**

साधू वासवानी पुल (कोरेगाव पार्क) ते बंडगार्डन पुलापर्यंत एकात्मिक वाहतूक आराखडा तयार करणे या कामांतर्गत पाण्याची लाईन स्थलांतरीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. R.B. Krishnani यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३,०७,७९,९०१/- पेक्षा ०.१००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३,०७,४९,१२१=१ अधिक जीएसटी र.रु.५५,३४,८४२/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१,७९,४७९/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.३,६४,६३,४४२=१ तसेच वर्क ऑर्डर दिनांकापासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार(सध्या उपलब्ध र.रु.०) पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति. महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/१७६९,दि.०५/०३/२०२४ चे पत्र.

**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यांनी करण्यात यावा, असे दि.१५/०३/२०२४ च्या सभेत ठरले होते.)**

**प्र.नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**